माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार

तक्रार क्रमांक : ४३/२०२३

तक्रारकर्ता, श्री. एस. एस. डहरवाल

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, नागपूर (ग्रामीण) नागपूर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, नागपूर (ग्रामीण) नागपूर

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १८.१०.२०२३

तक्रारकर्ता	:	**उपस्थित**
जन माहिती अधिकारी	:	**उपस्थित**
प्रथम अपीलीय अधिकारी	:	**अनुपस्थित**

व्दितीय अपील आदेशाचा दिनांक	आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक	मुळ तक्रार अर्जाचा दिनांक
०४.०७.२०२२	-----	०१.०२.२०२३

तक्रारकर्ता श्री. एस. एस. डहरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५मधील कलम १८(१) नुसार अपील क्र.१५७०/२०२०, दिनांक ०४.०७.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे दिनांक ०१.०२.२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १८.१०.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. एस.एस. डहरवाल व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय नागपर (ग्रा.), श्री. प्रफुल बांबल उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता श्री. एस. एस. डहरवाल यांचे व्दितीय अपील क्र. १५७०/२०२० यात दिनांक ०४.०७.२०२२ रोजी पारीत केलेले आदेश खालीलप्रमाणे आहे.

"सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज संबंधित मानीव जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केल्याचे दिसून येते. त्यानंतर दाखल प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ७ दिवसात अपिलार्थीस माहिती

पुरविण्यात यावी, असा आदेश पारीत केला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.१०.२०२० च्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ व २ बाबत माहिती पुरविण्यात येत असून मुद्दा क्र. ३ ची माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी तसेच मुद्दा क्र. ४ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने पुरविण्यात येणे शक्य नाही. त्याचबरोबर मुद्दा क्र. ५ ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांना मुद्दा क्रं. १ व २ ची माहिती प्राप्त झाली असून मुद्दा क्रं. ३ व ४ ची माहिती प्राप्त झाली नसल्याचा सुनावणी दरम्यान आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या जोडपत्र-अ नुसार मुद्दा क्रं. ३ व ४ ची माहिती कलम ५(४) व ५(५) नुसार संकलित करुन सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसात उपलब्ध करुन द्यावे. तसेच मुद्दा क्र.५ ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने ती माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घ्यावी, या आदेशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे."

उपरोक्त आदेश हे दिनांक २१.१२.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले. तक्रार अर्ज दिनांक ०१.०२.२०२३ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. वरील तक्रार अर्जावर आयोगाच्या वतीने सुनावणी सुचना जारी केल्यानंतर उपविभागीय अधिकारी नागपूर ग्रामीण येथील जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती अपिलकर्ता यांना दिनांक ०१.०२.२०२३ रोजी पुरविण्यात आली असल्याचे पत्र तक्रारदार श्री. डहरवाल यांना दिनांक ०६.०२.२०२३ रोजी प्राप्त झाले असल्याचे आढळून येते. अपिलार्थी यांनी त्यांच्या तक्रार अर्जात व लेखी युक्तीवादात पुरविलेली माहिती ही दिशाभूल करणारी, तसेच मुळ माहिती टाळणारी व अपुर्ण असल्याचा आक्षेप नोंदविला असून कलम २० अन्वये शास्ती कार्यवाही करण्याची मागणी देखील केलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी पुरविण्यात आलेली माहिती कलम २(च) नुसार कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असल्याप्रमाणे दिलेली असून जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात मौजा भोकारा येथील सर्व्हे नं. १०६/१ व ११३/२ या जमीनीसंदर्भातील महसुली प्राधिकरणाने केलेली कार्यवाही तसेच सदरील सर्व्हे नंबरचा नगर रचना विभागाकडून नकाशा मंजूर केलेला नसल्याने सदर सर्व्हे क्रमांकातील ५७ भुखंडाचे फेरफार रद्द करण्यात आले असल्यामुळे व प्रश्नाधिनी जमीनीमधील सहाय्यक संचालक नगर रचना नागपूर यांचेकडून अभिन्यास मंजूर केलेला नसल्यामुळे अभिन्यास मंजुरीबाबतचे दस्ताऐवज पुरविता येणे शक्य झाले नाही, असे नमूद केलेले आहे. तसेच याच अनुषंगाने दिनांक १४.०२.२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नागपूर यांनी दिनांक २२.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांना पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित केली असून सदर पत्राची प्रत ही अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना प्रत्यक्षात माहितीची अपेक्षा नसून उपरोक्त जमिनीवर महसुली प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या वैधतेविषयी आयोगाने दखल घेवून आदेश पारीत करावा तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कार्यवाही करावी, असे आढळून येते.

प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांनी याआधी अशाच प्रकारचे अनेक अर्ज दाखल केले असून वस्तुत: त्यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार अपिलीय प्राधिकरणाकडे अपील करणे

आवश्यक आहे. त्यांचा मुळ मुद्दा हा मौजा भोकारा येथील सर्व्हे नं. १०६/१ व ११३/२ या जमीनीवर महालक्ष्मी हाऊसिंग सोसायटी यांनी पाडलेल्या एकूण ५७ भुखंडापैकी अपिलार्थी यांनी खरेदी केलेला भुखंड क्रमांक २८ चा ७/१२ तयार करुन मिळणे हा मुळ उद्देश आहे. याबाबतीत याआधी तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांनी दिनांक २८ जुलै २०१७ रोजी आदेश पारीत केला असून ५७ प्लॉटचे फेरफार रद्द केलेले आहे. त्याविरुध्द कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता श्री. डहरवाल हे खोडसाळपणे व आकसपणे याच मुद्यांशी संबंधित माहिती अर्ज दाखल करीत असतात. त्यांचा अपील अर्ज व तक्रार अर्ज हा दिशाभूल करणारा असल्याचे यात नमूद केले आहे. प्रस्तूत प्रकरणी आयोगाने पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित महसुल प्राधिकरणाने याआधीच कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्ता यांना प्रदान केली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

आदेश

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०१.१०.२०२४

जावक क्रमांक --8025---------- दिनांक 17 NOV 2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★